# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- पाणी टँकर भाडे या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ६३,६६,६७ (क),९०,३१९ कलम अन्वये जनतेच्या सेवेसाठी किंवा सुरक्षिततेसाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विविध ठिकाणी विकास कामे करण्यासाठी आर्थिक तरतूद करणे हे मा.प्रशासक तथा आयूक्त सो. यांचे अधिकार आहेत. त्याचप्रमाणे याअधिनियमाच्या कलम ९५ व ९६ प्रमाणे दर वर्षी उत्पन्न व खर्चयांचे अंदाजपत्रक तयार केले जातात. सन २०२३ - २०२४ या आर्थीक वर्षात उत्पन्न व खर्च करण्यासाठी लेखाशिर्ष निहाय तसेच बाब निहाय आर्थीक तरतूद करण्यांत आली होती. या तरतूदीमधून आतापर्यत खर्च करण्यात आलेला आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे नमूद आहे. **(आकडे लाखात)**

| अ.क्र | लेखाशिर्षाचे नाव | सन २०२३-२४ करीता करणेत आलेली तरतूद | सन २०२३-२४ मध्ये झालेला प्रत्यक्ष खर्च | शिल्लक | पुर्नविनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | पाणी टँकर भाडे | ५० लक्ष | ४९.९३ लक्ष | ०.०७ | ५० लक्ष |
| | एकुण | ५० लक्ष | ४९.९३ लक्ष | ०.०७ | ५० लक्ष |

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षात जो अर्थसंकल्प मंजूर झाला त्या अर्थसंकल्पामध्ये **पाणी टँकर भाडे** विशेष बाब या सोईच्या दृष्टीने शहरातील नागरीकांना शुध्द पाणी पुरवठा होणेकरीता निधी अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. सदर लेखाशिर्षामध्ये पुर्नविनियोजनाच्या प्रस्तावास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतूदी व विशेषः व कलम ४५२ (अ) च्या कलम (१ब) नुसार मा.प्रशासक तथा आयुक्त सो यांनी दिनांक ०२/०६/२०२३ रोजी मान्यता मिळालेली आहे.

शासन आदेश क्र.एम.सी.ओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२) नवि-१४ दि.०६ जून २०२२ रोजी नुसार मा.महासभा व मा स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी नि.श.महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामूळे भिवंडी महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाकरिता पाणी टँकर भाडे या लेखाशिर्षात रुपये २० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. प्रभाग समिती क्र.१ ते ५ च्या कार्यक्षेत्रात पाणी टंचाईची समस्या निर्माण झाल्यामुळे खाजगी पाण्याचे टँकर द्वारे पाणी पुरवठा केल्यामुळे सदरची तरतुद संपलेली आहे. या तरतुदीमध्ये यापुर्वी पुर्नविनियोजन द्वारे रु. ३० लक्ष अशी एकुण ५० लक्ष तरतुद करण्यात आलेली आहे. या दरतुदीमधुन रु.४९.९३ लक्ष इतकी तरतुद खर्च झालेली आहे. उर्वरित रु.०.०७ मात्र तरतुद शिल्लक आहे.

सन २०१५-१६ या सालाकरीता भिवंडी शहरातील काही विविध भागात पाणी टंचाईची समस्य निर्माण झाल्यामुळे खाजगी टॅकर भाड्याने पुरविणे प्रति दिन ९६ फेरे या प्रमाणे २७० दिवसांचे व सणाचे ५१० फेरे असे एकुण २६४३० फे-याचे प्रति फेरा रु. ७०० मात्र या प्रमाणे रु.१,८५,०१०००/- मात्रची निविदा मे ओमसाई इंटरप्रायजेस यांचे नावे मंजुर झालेली होती. मे. ओमसाई इंटरप्रायजेस यांनी भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका विरुध्द कंमेन्ट पिटिशन नं. ५४५/२०१८ करुन मा. उच्च न्यायालयात पाण्याच्या टॅकरच्या देयका संबंधी यांचिका क्र.९८९/२०१९ मध्ये उच्च न्यायालयात यांचिका करिता यांनी अवमान यांचिका दाखल केली होती. दि.१३/९/२०१७ रोजीच्या पारित केलेल्या आदेशान्वये यांचिकाकृता यांनी दि.८/७/२०१५ व दि.२९/१०/२०१५ अन्वये भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे खाजगी टॅकर देयक मिळणेकामी पत्र दिलेले आहे. तरी संबंधीत ठेकेदार यांना प्रलंबित देयके रु. ३७०५८००/- मात्र व भिवंडी शहरात धार्मिक सण पाणी टंचाई भागात तसेच आपात्कालीन परिस्थिती उद्भवल्यास खाजगी पाण्याचे टॅकर द्वारे पाणी पुरवठा करणेकामी रु.१३ लक्ष अशी ५० लक्ष तरतुद अभावी प्रस्ताव प्रलंबित आहेत. पाणी टॅकर भाडे या लेखाशिर्षात रु. ५० लक्ष पुर्नविनियोजन करण्याची आवश्यकता आहे.

सन २०२३-२४ च्या आर्थिक वर्षात एकात्मिक पाणी पुरवठा योजना या लेखाशिर्षकात रु.२२४.७२ लक्ष इतकी तरतुद करण्यात आलेली आहे. या तरतुदी मधुन आता पर्यंत रु. १०५.२२ लक्ष खर्च झालेला आहे. उर्वरित रु. ११९.५० लक्ष तरतुद शिल्लक आहे. या तरतुदी मधुन पाणी टॅकर भाडे या लेखाशिर्षात रु.५० लक्ष पुर्नविनियोजन करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकडून प्रस्तावित करण्यात येत आहे.

**प्रशासकिय ठराव क्रमांक :** २४९ **दिनांक :** ०५ /०९/ **२०२३**

पाणी टॅकर भाडे या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामी करणेकामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठ विभाग पाणी टॅकर भाडे या लेखाशिर्षात तरतूदीचे पुर्नविनियोजन करणेकामीच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजूर देऊन पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी नि. शहरमहानगरपालिका, भिवंडी.**